# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 04/10/2021 (सोमवार)

(दुपार)

---

### अपघातात मृत्यू

1) पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत 19 कि. मी. अंतरावरील मौजा सातनवरी येथे 03/10/2021 चे 14.20 वा. ते 14.30 वा.दरम्यान आरोपी चालक नामे– आशुतोष चंद्रप्रकाश त्रिपाठी वय 26 वर्ष, रा. 201 श्री स्वरूप निकेतन एस व्ही आर डी अशोकवन बोरीवली मुबंई, ह.मु. डॉ पंजाबराव देशमुख, मेडीकल कॉलेज पी जी हॉस्टेल अमरावती हा मारोती सुझुकी एस क्रॉस वाहन क्र एमएच– 27/बीई – 4614 ने अमरावती वरून राष्ट्रीय महामार्ग क्र 53 ने नागपुर कडे जात असतांना त्याचे ताब्यातील कार भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मौजा सातनवरी गावाजवळील हनुमान मंदीर समोरील हायवेचे रोडला लागुन असलेल्या सिंमेट कठवडयाला धडक मारून कठडा तोडुन डावे बाजुस सर्व्हीस रोडचे सिमेंटच्या कठवडयावर बसुन बसची वाट पाहत असलेल्या 1) चैताली विनोद सोनबरसे, वय 15 वर्ष, 2) बंडु नमोराव सालवनकर वय 55 वर्ष, 3) शौर्य सुबोध डोंगरे वय 8 वर्ष, 4) शैराली सुबोध डोंगरे वय 6 वर्ष व 5) सौ ललीता बाबुलाल सोनबरसे वय 55 वर्ष रा. सातनवरी यांना मोटार कारने धडक मारून अनु क्र 1 ते 4 यांचे मरणास व अनु क्र 5 हिला गंभीर जखमी करण्यास कारणीभुत झाला. तसेच आरोपी सोबत मोटारकार मध्ये असलेल्या महिला नामे 1) श्रद्धा महेश सोनी वय 27 वर्ष 2) ऐश्वर्या विनायक सावळे वय 27 वर्ष दोन्ही रा पंजागराव देशमुख मेडीकल कॉलेज हॉस्पीटल अमरावती जि अमरावती यांना व स्वता जखमी होणेस कारणीभुत झाला.

सदर प्रकरणी सर तर्फे पोहवा दिलीप इंगळे यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री चंद्रकांत काळे मो क्र 8888803650 हे करीत आहे.

2) पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 10 कि. मी. अंतरावरील मौजा चारगाव गोठाळी रोड येथे 03/10/2021 चे 12.15 वा. ते 15.30 वा. दरम्यान आरोपी नामे– दिपकसिंग हिरासींग बावरी( मृतक ) वय 40 वर्ष, रा. नांद ता. भिवापुर जि.नागपुर हा आपले ताब्यातील एम.एच.–40/सि.व्ही– 1587 क्रमांकाच्या मोटरसायकल वर डब्बल सिट बसुन उमरेड कडुन हिंगनघाट कडे जात होता. त्यादरम्यान त्याने आपले ताब्यातील मोटरसायकल भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन समोरून येणाऱ्या एस.टी. बस ला समोरून धडक दिली. या अपघातात तो स्वताचे मरणास कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी सर तर्फे पोहवा रामेश्वर रावते यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि राजिव लोले हे करीत आहे.

# विनयभंग

पो.स्टे. उमरेड :– अल्पवयीन फिर्यादी/पीडित वय 15 वर्ष दि 25/09/2021 रोजी दुपारी 12.00 चे दरम्यान एम सी आय टी चे क्लास लावण्यासाठी कॉम्पुटर इन्स्टीयुट बुधवारी पेठ उमरेड येथे गेली होती. तिथे अगोदरच एक माणुस हजर होता तो फिर्यादीचे नाव, कुठे राहते, तुझी कास्ट काय, क्लास कुठे लावली हयाबाबत विचापुस केली. तसेच दि 27/09/2021 रोजी दुपारी 02.30 वा. चे दरम्यान टयुशन करून ती घरी परत येत असतांना फिर्यादीचे सायकल चा पाठलाग करीत ग्रे कलरची स्कुटी ने आला व फिर्यादीशी बोलण्याचा प्रयत्न केला. दि 03/10/2021 राजी 12.00 ची टयुशनला ब्रेक झाला असतांना फिर्यादी व तिची मेत्रीण वय 15 वर्ष हिच्या सह पीण्याचे पाणी आणण्यासाठी खाली आली असता तो माणुस वाट पाहत असल्यासारखा दिसला. दुपारी 12.00 वा टुशन संपलयावर तो परत दिसला त्यामुळे फिर्यादीने घाबरून आपले वडीलांना माहीती दिली नंतर फिर्यादी सायकलने भिसी नाका चौक पाणीपुरी दुकाणचे समोर आली असता, त्याने ग्रे कलरची स्कुटी क्रमांक एम एच– 40/बी व्ही– 4921 ने तो आडवा झाला व हाय असे बोलला. त्यावेळी फिर्यादीचे वडील आले व त्यास पकडुन पोस्टे ला आणले त्याला नाव विचारले असता त्याचे नाव आरोपी नामे– सुमित भिमराव मेश्राम, वय 29 वर्ष, रा सेव, उमरेड असे सांगितले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 354 (डी) भादंवी. सहकलम 8 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार कुलकर्णी हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर